# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः12.10.2024** **वारःशनिवार**

---

1. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या धावपट्टीची काल यशस्वी चाचणी
2. महासायबर - महाराष्ट्र सायबर सुरक्षा प्रकल्पाचं उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते उद्घाटन
3. साडे तीन मुहूर्तांपैकी एक असलेल्या दसऱ्यानिमित्त राज्यभरात उत्साह;
4. नागपुरात रेशीमबागेत आज संघाचं पथसंचलन; तर दीक्षाभूमीवर धम्मचक्र प्रवर्तन दिन सोहोळा आणि
5. राज्यात आजही सर्वत्र पावसाचा अंदाज

**<u>नवी मुंबई विमानतळ</u>**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या धावपट्टीची काल यशस्वी चाचणी घेण्यात आली. हवाई दलाचं सी 295 हे विमान धावपट्टीवर यशस्वीरित्या उतरवण्यात आलं तसंच पुण्यातून निघालेल्या सुखोई या लढाऊ विमानानंही या धावपट्टीवरुन यशस्वी उड्डाण केलं. यावेळी केंद्रिय नागरी हवाई वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अन्य मान्यवर उपस्थित होते. विमानतळाचा महत्त्वाचा टप्पा पूर्ण झाला असून हा दिवस राज्याच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहीला जाईल असं मुख्यमंत्री यावेळी म्हणाले. तर हा प्रवाशांसाठी फायदेशीर प्रकल्प असेल आणि यामुळे राज्याच्या विकासाला चालना मिळेल असा विश्वास फडणवीस यांनी व्यक्त केला.

**<u>महासायबर</u>**

सर्वोत्तम तंत्रज्ञानानं सज्ज असलेल्या महाराष्ट्र सायबर सुरक्षा प्रकल्पामुळे डिजिटल माध्यमातून होणाऱ्या फसवणुकीचं प्रमाण कमी होईल तसंच जनतेमधली सायबर हल्ल्याची भीती कमी होईल असा विश्वास उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. महा सायबर-महाराष्ट्र सायबर सुरक्षा प्रकल्पाचं उद्घाटन काल मुंबईत, फडणवीस यांच्या हस्ते झालं, त्यावेळी ते बोलत होते. सायबर गुन्ह्यांवरील त्वरीत कारवाईसाठीच्या 14407 या दूरध्वनी मदत क्रमांकाचा प्रारंभ या कार्यक्रमात करण्यात आला. तंत्रज्ञान नेहमी बदलत राहतं, त्यामुळे तंत्रज्ञानातली प्रणाली हाताळणारे लोकही गतीमान असायला हवेत असं सांगून, या केंद्रात दरवर्षी पाच हजार पोलिसांना प्रशिक्षित करण्याची व्यवस्था आहे अशी माहिती फडणवीस यांनी दिली. कार्यक्रमाला राज्याचे पोलीस महासंचालक, गृह विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव, वरिष्ठ पोलिस अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

**<u>आरबीआय</u>**

आर्थिक देवाणघेवाण सेवा पुरवणाऱ्या सर्व डिजिटल मंचांनी, दिव्यांग व्यक्तींनाही ही सेवा सहज वापरता येईल अशा रितीने त्यात सुधारणा करावी अशा सूचना भारतीय रिझर्व्ह बँकेनं दिल्या आहेत. सर्व बँका तसंच बिगर बँकिंग देयक सेवा पुरवठादारांनी दिव्यांगांच्या गरजेनुसार आपल्या यंत्रणा आणि उपकरणांमध्ये सुधारणा करुन घेणं गरजेचं आहे असं आरबीआयनं याबाबतच्या निवेदनात म्हटलं आहे. हे करतानाच आपल्या यंत्रणेच्या सुरक्षेबाबतही योग्य ती दक्षता घ्यावी असंही रिझर्व्ह बँकेनं सांगितलं आहे.

**<u>मुख्यमंत्री-सिडको</u>**

कायदे, नियम लोकांच्या भल्यासाठी असावेत. लोकं कायद्यासाठी नाहीत तर, कायदा लोकांच्या भल्यासाठी वापरायला हवा असं मत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल व्यक्त केलं. सिडकोच्या आणि नवी मुंबई महानगरपालिकेच्या विविध नागरी सुविधा प्रकल्पांचं लोकार्पण आणि महाराष्ट्र भवनाच्या भूमिपूजन समारंभात मुख्यमंत्री बोलत होते. पनवेल महापालिकेचा शास्ती कर रद्द करण्याचा तसंच महापालिकेच्या परिवहन सेवेत महिलांना 50 टक्के सवलत देण्याचा निर्णय मुख्यमंत्री शिंदे यांनी यावेळी जाहीर केला.

**<u>विजयादशमी</u>**

साडे तीन मुहूर्तांपैकी एक असलेला दसरा म्हणजेच विजयादशमीच्या सणाचा आज राज्यभरात उत्साह आहे. गेले नऊ दिवस सुरू असलेल्या शारदीय नवरात्र उत्सवाच्या सांगतेचा आजचा दिवस. यानिमित्त राज्यभरातल्या देवीच्या मंदिरांमधून सीमोल्लंघनाच्या मिरवणूका काढल्या जाणार आहेत. देवीचं शक्तीपीठ असलेल्या कोल्हापुरातला शाही दसरा सर्वत्र प्रसिद्ध आहे. आज संध्याकाळी देवी अंबाबाईची पालखी निघणार असून दसरा चौकात छत्रपती घराण्यातील मान्यवरांकडून शमी पूजन केलं जाईल.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा विजयादशमी सोहोळा आज सकाळी सात वाजून 40 मिनिटांनी नागपूरमधल्या रेशीमबाग मैदानावर आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाला मुख्य अतिथी म्हणून इस्रोचे माजी अध्यक्ष डॉक्टर के. राधाकृष्णन तसंच सरसंघचालक डॉक्टर मोहन भागवत उपस्थित राहणार आहेत. माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव देखील या कार्यक्रमात सहभागी होणार आहेत. राज्यात इतरत्रही आज संघातर्फे पथसंचलन आणि शोभायात्रांचं आयोजन करण्यात आलं आहे.

आज धम्मचक्र प्रवर्तन दिनही साजरा होत आहे. या निमित्त नागपूरमधल्या दीक्षाभूमीवर आज संध्याकाळी मुख्य कार्यक्रम होणार असून उत्तरप्रदेशमधल्या कुशीनगर भिक्षु संघाचे अध्यक्ष भदंत ए.ए.बी. ज्ञानेश्वर, महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलनाचे प्रणेते आकाश लामा आणि दीक्षाभूमीवरील बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीचे अध्यक्ष भदंत आर्य नागार्जुन सुरेई ससाई प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहतील. राज्यातले तसंच देश-परदेशातले लाखो अनुयायी या सोहोळ्यात सहभागी होण्यासाठी नागपुरात आले आहेत. प्रशासनानं यासाठी सर्व सोई सुविधांची चोख व्यवस्था ठेवली आहे. दरम्यान काल दीक्षाभूमीवर भदंत ससाई यांच्या नेतृत्वात पंचशील ध्वजारोहण करण्यात आलं. दीक्षाभूमी स्मारक समितीचे सदस्य यावेळी उपस्थित होते.

**<u>फडणवीस</u>**

पुणे आणि पिंपरी चिंचवड शहरातलं वाढत्या नागरिकीकरण तसंच औद्योगिकीकरणामुळे निर्माण होणाऱ्या वाढत्या सुरक्षा आव्हानांचा सामना करण्यासाठी गुणात्मक परिवर्तन आवश्यक आहे असं मत राज्याचे गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केलं. पुण्यातील नवीन पोलीस आयुक्तालयाच्या इमारतीचं भूमिपूजन काल झालं, त्यावेळी ते बोलत होते. पुणे शहरातील सात नवीन पोलीस ठाण्यांचं आणि पिंपरी चिंचवडमधल्या चार पोलीस ठाण्याचं उद्घाटन या कार्यक्रमात करण्यात आलं. न्याय वैद्यक विभागाच्या संगणकीकरणाचा प्रारंभही यावेळी करण्यात आला. कार्यक्रमाला केंद्रीय नागरी वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, खासदार मेधा कुलकर्णी यांच्यासह जिल्ह्यातले लोकप्रतिनिधी आणि पोलिस अधिकारी उपस्थित होते.

**अजित पवार**

नदीतून वाहून जाणारं पुराचं पाणी बंदीस्त पूर कालव्यांच्या माध्यमातून पूर चाऱ्यांद्वारे पाझर तलाव आणि बंधाऱ्यांमध्ये सोडण्याचं काम राज्यासाठी पथदर्शी ठरणार आहे. यामुळे दुष्काळी ठसा पुसला जाऊन सिन्नर तालुका जलयुक्त होईल असा विश्वास उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी व्यक्त केला. नाशिक जिल्ह्यातल्या सिन्नर तालुक्यातील विविध विकासकामांचं लोकार्पण अजित पवार यांच्या हस्ते काल झालं, यानिमित्त आयोजित सभेत ते बोलत होते. या कालव्यातून शेतकऱ्यांच्या शिवारापर्यंत पाणी पोहोचणार असून शेतकरी सुजलाम सुफलाम होणार आहे. यामुळे शेतकऱ्यांचा आर्थिक विकास होण्यासाठी चालना मिळणार आहे असं पवार म्हणाले.

**चित्रपट धोरण समिती**

चित्रपट आणि मनोरंजन क्षेत्रातल्या बदलत्या पद्धतींच्या अनुषंगानं चित्रपट धोरण समिती स्थापन करण्याचा निर्णय घेतल्याची माहिती सांस्कृतिक मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी काल दिली. यामुळे राज्यातल्या चित्रपटसृष्टीला नवी दिशा मिळेल असं सांगून चित्रपट निर्मिती केंद्रांना प्रोत्साहन देणे, तांत्रिक आणि कौशल्य विकासाच्या क्षेत्रात नवनवीन संधी उपलब्ध करणे यासाठी समितीमार्फत धोरण आखण्यात येणार असल्याचं मुनगंटीवार म्हणाले.

**सेमीकंडक्टर प्रकल्प-रत्नागिरी**

रत्नागिरी जिल्ह्यातल्या वेल्लोर सेमीकंडक्टर प्रकल्पाचं भूमीपूजन काल जिल्ह्याचे पालकमंत्री उदय सामंत यांच्या हस्ते झालं. व्हीआयटी सेमिकॉन्स पार्क प्रायव्हेट लिमिटेडचे संचालक ताजपूर संपथ कण्णन यावेळी उपस्थित होते. डिफेन्स क्लस्टरदेखील रत्नागिरीत होणार असून, या दोन्ही प्रकल्पांतून मिळून 38 हजार तरुणांना रोजगार मिळणार आहे. तीन वर्षांनंतर इथे तयार झालेली बंदूक सैनिकांच्या हातामध्ये असेल, ही अभिमानाची बाब असल्याचं सामंत या वेळी म्हणाले.

**सयाजी शिंदे**

ज्येष्ठ अभिनेते सयाजी शिंदे यांनी काल राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला. सयाजी शिंदे यांच्या पक्षप्रवेशामुळे पक्षाला अधिक बळकटी येईल तसंच जनकल्याणाच्या कार्यात त्यांचं मोलाचं योगदान लाभेल, असा विश्वास पक्षाचे अध्यक्ष अजित पवार यांनी व्यक्त केला आहे.

**अटक**

पुणे जिल्ह्यातल्या बोपदेव घाटातल्या सामुहिक बलात्कार प्रकरणातील दोन संशयितांचा शोध घेण्यात येत असून, एकाला एकाला कोंढव्यातील येवलेवाडी परिसरातून ताब्यात घेण्यात आलं असून, या संशयितांची सखोल चौकशी करण्यात येत आहे अशी माहिती पोलिसांनी दिली.

**हवामान**

राज्यात आज सर्वत्र पावसाची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे. कोकण किनारपट्टीवर सोसाट्याचे वारे वाहण्याची शक्यता असून चारही विभागात तुरळक ठिकाणी मेघगर्जना आणि विजांच्या कडकडाटासह जोरदार पाऊस पडेल असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार.